समाजाला कीड लावण्याचे काम राजकीय घरातून
>> पान 2

दिल्लीमध्ये महाराष्ट्र शासनामार्फत उभारण्यात येणाऱ्या सांस्कृतिक भवनाचा आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर
>> पान 3

मोताळा नगराध्यक्ष माधुरी देशमुख यांच्यासह इतरांना अटकपूर्व जामीन मंजूर
>> पान 4

**सुविचार**
यशाचा खरा अर्थ समजून घ्या.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



सनी देओलनं घेतली लडाखमध्ये दलाई लामा यांची भेट, चाहत्यांनी केलं कौतुक...

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 10 ■ मंगळवार, दि. 29 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# पर्यटकांना मारणारे ३ दहशतवादी ठार!

## पहलगाम हल्ल्याचा बदला, ऑपरेशन महादेवला यश

**श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. ऑपरेशन महादेव अंतर्गत, सोमवारी (२८ जुलै) पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांना सुरक्षा दलांनी ठार केले. तीन दहशतवाद्यांमध्ये सुलेमान शाहची ओळख पटली आहे. पहलगाम हल्ल्यात सुलेमानचा सहभाग होता. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला करून २६ जणांना ठार मारले होते. यात एक काश्मिरी नागरिक सहभागी होता. तेव्हापासून दहशतवाद्यांचा शोध सुरू होता. दरम्यान, सोमवारी सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांना ठार मारले.**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानी दहशतवादी आसिफ फौजी (कोडनेम मुसा), सुलेमान शाह (युनुस) आणि अबू तल्हा (आसिफ) यांचा सहभाग होता. इतर दोन दहशतवादी आदिल गुरी आणि अहसान हे स्थानिक दहशतवादी होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूर सुरू केले. पाकिस्तान आणि पीओकेमध्ये हल्ले करून १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. त्यानंतर युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली.

आजही संसदेत ऑपरेशन सिंदूरवरून गदारोळ झाला आणि दोन्ही सभागृहात त्यावर चर्चा सुरू आहे.



तिन्ही पाकिस्तानी दहशतवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. घटनास्थळावरून एक अमेरिकन बनावटीची कार्बाइन, एक एके-४७ रायफल, १७ रायफल ग्रेनेड आणि इतर साहित्यही जप्त करण्यात आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये सुलेमान, यासिर आणि अली यांचा समावेश आहे. पहलगाम हल्ल्यात सुलेमान आणि यासिर यांचा सहभाग होता. या भागात चौथ्या दहशतवाद्याची उपस्थिती असण्याची शक्यता आहे.

२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरमधील पाहलगामजवळील बाईसरान व्हॅली येथे दहशतवाद्यांनी पर्यटक हल्ला केला. या घटनेत २६ लोक ठार झाले, ज्यात २५ पर्यटक आणि एक स्थानिकाचा समावेश होता. पहलगाम हल्ल्यात महाराष्ट्रातील एकूण सहा पर्यटक ठार झाले होते. यामध्ये पुणे, ठाणे/डोंबिवली, पनवेल, नागपूर येथील रहिवासी होते. त्यापैकी तीन डोंबिवलीचे हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने होते. तसेच पनवेलचे दिलीप देसले यांचा समावेश होता.

### लष्कराने काय म्हटले?

श्रीनगरमधील दाचिगाम राष्ट्रीय उद्यानाजवळील हरवन परिसरात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक सुरू झाल्याची माहिती लष्कराने दुपारी १२:३० वाजता दिली. लष्कराच्या चिनार कॉर्प्सने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर लिहिले की, ऑपरेशन महादेव - 'जनरल एरिया लिडवास' मध्ये संपर्क स्थापित झाला आहे. दुपारी १:३० वाजता लष्कराने सांगितले की तीन दहशतवादी मारले गेले आहेत. दहशतवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी हरवनच्या मुलनार भागात कारवाई सुरू केली होती. लष्कराच्या कारवाईदरम्यान संसदेत ऑपरेशन सिंदूरची चर्चा सुरू आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लोकसभेत सांगितले की, आमचे सरकार, आमचे सैन्य आणि आमच्या लोकशाही संस्था, सर्व मिळून देशाच्या एकता, अखंडता आणि सुरक्षेसाठी आवश्यक असलेले प्रत्येक पाऊल उचलण्यास वचनबद्ध आहेत.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैन्य दलाचे अभिनंदन



**पुणे/प्रतिनिधी :** लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे पाप पहलगाममध्ये दहशवाद्यांनी केले. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय लष्कराने त्यांना योग्य उत्तर दिले आहे. पाकिस्तानला जशाच तसे उत्तर दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय सैनिकांचे मी अभिनंदन करतो अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

लोकमान्य टिळक यांचे वंशज दीपक टिळक यांचे निधन झाले आहे. कुटुंबांच्या सांत्वनासाठी भेट दिली. पत्रकारिता आणि मराठी संस्कृतसाठी मोठे नुकसान झाले आहे. केसरी वृत्तपत्राने स्वातंत्र्याचा मोठा लढा उभारला, तोच वारसा त्यांनी जपला आहे. लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे पाप पहलगाममध्ये दहशवाद्यांनी केले. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय लष्कराने त्यांना योग्य उत्तर दिले आहे. पाकिस्तानला जशाच तसे उत्तर दिले आहे. इट जबाब पत्थर से, खून का जवाब खून से गोली का जवाब मिसाल से देंगे असे सांगितले होते. खऱ्या अर्थाने पाकिस्तानला चारही मुंड्या चित करणारा आपल्या भारतीय सैन्य दलाचे अभिनंदन केले. पहलगाम मध्ये लाडक्या बहिणींचा कुंकू ज्यांनी पुसले त्यांना ठार करण्याची मागणी भारतीयांनी केली होती.आज आतंकवादी भारतीय सैन्य दलाने मारले आहेत.भारतीय सैन्य दलाची ही अभिनंदन कामगिरी आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सैन्य दलाचे मी अभिनंदन करतो.असे अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकदा शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** दरवर्षी शिक्षक दिनानिमित्त प्रातिनिधिक स्वरूपात शिक्षकांना क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. सन २०२५ च्या पुरस्कारासाठी इच्छुक शिक्षकांनी ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षण संचालक महेश पालकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

या पुरस्कारासाठी राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित खासगी प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांनी आपली आवेदने ३१ जुलै २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत https://forms.gle/ixTDiuvgqqEwVuaA7 या लिंकवर ऑनलाईन सादर करावीत, असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# घरकुलसाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येकाला घर, वीजदर २६ टक्क्यांनी कमी होणार

### वर्ध्यातील भाजपच्या मंथन मेळाव्यातून मुख्मंत्री फडणवीसांचा घोषणांचा पाऊस

**वर्धा/प्रतिनिधी :** तुम्हाला शब्द देतो की हे सरकार जेव्हा ५ वर्ष पूर्ण करेल, तेव्हा महाराष्ट्राचा संपूर्ण ट्रान्सफॉर्मेशन झालेला तुम्हाला पाहायला मिळेल. महाराष्ट्र उत्तम प्रदेश आहेच. मात्र, दिन दलित, मागास सर्वांचा विकास तुम्ही आगामी काळात पाहणार. त्यासाठी सरकारने विशेष नियोजन केले आहे. राज्यात विकासकामे सर्व ऑटो पायलट मोडमध्ये चाललं पाहिजे अशी स्थिती आपल्याला निर्माण करायची आहे. अपूर्ण प्रकल्प मग ते सिंचनचे असतील किंवा विकासाचे असतील ते पूर्ण करण्यावर आपला प्रथम भर आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रात एकाच वर्षात ३० लाख घरे मंजूर केली आहे. तर २०१८ पर्यंत ज्यांनी ज्यांनी सरकारकडून विविध योजनेमध्ये घरकुलसाठी नोंदणी केली असेल, मग तो कुठल्याही जातीचा का असू नये त्याला घरे मिळणार आहे.अशी मोठी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

बेघरमुक्त महाराष्ट्रकडे आपण वाटचाल करत आहोत. केंद्राच्या मंजुरीने आपण नवीन सर्वेक्षण सुरू केले आहे. सोबतच २०२५ ते २०३० पर्यंत वीजदर घोषित करणारे आपले पहिले सरकार आहे. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते वर्ध्यात होत असलेल्या भाजपच्या विशेष विभागीय मंथन बैठकीत बोलता होते.

विदर्भात आपण वैनगंगा-नळगंगा जोड प्रकल्प हाती घेतला आहे. विदर्भाचे चित्र हा प्रकल्प बदलेल. येत्या काळात दहा हजार एकर जागा सिंचनाखाली येईल. परिणामी विदर्भाचा दुष्काळ १००% भूतकाळ होणार, अशी व्यवस्था आपण विदर्भात निर्माण करू. सोबतच नानाजी देशमुख कृषी समृद्धी योजना पहिल्या टप्प्यात पश्रि्चम महाराष्ट्रात राबवली. आता दुसऱ्या टप्प्यात ती संपूर्ण विदर्भात राबवून त्यासाठी ५००० कोटींची गुंतवणूक आपण करणार आहोत. अशी मोठी घोषणाहि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.



ग्रामीण भागात शंभर टक्के पांदण रस्ते तयार करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. गेल्या २० वर्षात बघितलं दरवर्षी वीजदर २० टक्क्यांनी वाढतात. पण आता मात्र आपण नवीन दर एमईआरसी दर मंजूर करुन घेतले, दरवर्षी वीजेचे दर आपण कमी करणार आहोत. वीज वापरणाऱ्या ७० टक्के ग्राहकांचे वीजबिल २६ टक्क्यांनी कमी होणार. डिसेंबर २०२६ नंतर आपल्या शेतकऱ्यांना विजेसाठी रात्री शेतावर जावं लागणार नाही. सोबतच१०० युनिट पर्यंत वीज वापरतात त्यांच्या २०२४च्या वीज बिलेच्या तुलनेत २०३० पर्यंत विजेचे बिल दर वर्षी कमी होत जाणार आहे. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आपले विरोधक हे आपल्याशी विकासात स्पर्धाच करु शकत नाहीत. मोदीजींनी विकासाची दिशा आणि विकासाचा जो वेग आपल्याला दिलेला आहे, त्याच्याशी त्यांना स्पर्धा करता येत नाही. त्यामुळे ते चुकीची माहिती पसरवण्याची मोहीम चालवत आहेत. ते रोज एक वेगळा नरेटिव्ह देण्याचा प्रयत्न करतात. ज्यावेळी विकासाशी स्पर्धा करता येत नाही, त्यावेळी विकासावर चर्चा होऊनच द्यायची नाही. विकासावर चर्चा झाली तर लोक त्यांना प्रश्र्न विचारतात, तुम्ही सत्तेत असताना काय केले. विरोधकांकडे दाखवण्यासारखी एकही गोष्ट नाही. त्यामुळे ते दररोज नवनवे नरेटिव्ह तयार करतात.

# पंढरपूरवर पुराची टांगती तलवार!



**पंढरपूर/प्रतिनिधी :** राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. अनेक भागात नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. तसेच धरणांच्या पाणीसाठ्यात देखील वाढ झाली आहे. दरम्यान, पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. त्यामुळं तेथी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग उजनी धरणात येत आहे. त्यामुळं उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यात येत आहे. उजनी धरणातून १ लाखाहून अधिक विसर्गाने पाणू सुरु असून पंढरपूरमध्ये पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. चंद्रभागा नदीतील वाळवंट पाण्याखाली गेलं असून, आपत्कालीन यंत्रणा अद्याप झोपलेलीच असल्याचं पाहायला मिळत आहे.

पुणे आणि सातारा परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उजनी धरणातून तब्बल ७१ हजार ६०० तर वीर धरणातून ३२ हजार ६६३ क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यात येत असल्याने चंद्रभागेत प्रचंड पाण्याचा प्रवाह पोहचू लागला आहे. यामुळे चंद्रभागेची पाणी पातळी कमालीची वाढत चालली असून आज रात्रीपर्यंत जवळपास एक लाख क्युसेक विसर्गने पाणी पात्रात पोचणार आहे. आधीच चंद्रभागेतील मंदिरे व वाळवंट आणि पाण्याखाली गेली आहे. सध्या श्रावण महिना असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असून अशा धोकादायक पाण्यात भाविक स्नानासाठी उतरू लागल्याने धोका वाढत चालला आहे. असे असूनही प्रशासनाची आपत्कालीन यंत्रणा मात्र अजूनही झोपलेलीच असून तातडीने चंद्रभागेत उतरणाऱ्या भाविकांना रोखण्यासाठी बॅरिगेटिंग केले नाही त्यामुळं मोठी दुर्घटना उद्धववण्याची शक्यता आहे. सध्या सातत्याने भाविक चंद्रभागेत बुडण्याच्या घटना समोर येत असताना प्रशासन मात्र अजूनही स्वस्त असल्याने पुन्हा भाविकांना धोका निर्माण होऊ शकतो

## शनि शिंगणापूर देवस्थानच्या सीईओंची आत्महत्या, महाराष्ट्रात खळबळ

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** शनि शिंगणापूर देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन शेटे यांनी त्यांच्या निवासस्थानी आत्महत्या केल्याची अत्यंत धक्कादायक बातमी सोमवारी सकाळी समोर आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून विविध कारणांमुळे चर्चेत असलेल्या या देवस्थानमध्ये ही घटना घडल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. शेटे यांच्या आत्महत्येमागे नेमके काय कारण आहे, हे अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी, देवस्थानातील अनियमितता आणि सुरू असलेल्या चौकशीचा या घटनेशी संबंध असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

शनि शिंगणापूर देवस्थान गेल्या काही काळापासून सतत वाद आणि आरोपांच्या भोवऱ्यात सापडलेले आहे. त्यात प्रामुख्याने ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांची नियुक्ती हा विषय सर्वात वादाचा विषय ठरलेला आहे.

सुमारे महिन्याभरापूर्वी ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्याने देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर जोरदार टीका झाली होती. या प्रकरणामुळे मोठा वाद निर्माण होऊन अखेरीस या कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्यात आले होते.

# ब्रँड ठाकरेने महायुतीची धाकधूक वाढवली

## राज-उद्धव ठाकरेंना रोखण्यासाठीचा प्लॅन बी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काल राज ठाकरेंनी उद्धव ठाकरे यांना मातोश्रीवर जाऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि पुन्हा एकदा दोन बंधू एकत्र येण्याची चर्चा सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी जर ठाकरे बंधू एकत्र आले तर महायुतीने त्यासाठी प्लॅन बी तयार केला असल्याची माहिती समोर आली आहे. ठाकरे बंधूंसाठी महायुतीने नो रिस्क धोरण अवलंबल्याची माहिती आहे. मतांचे विभाजन होऊ नये आणि त्याचा ठाकरे बंधूंना फायदा होऊ नये, यासाठी महायुतीने विचारमंथन करुन रणनीती आखली आहे.

विधानसभेत मिळालेल्या घवघवीत यशानंतर आता महायुतीला आव्हान असणार आहे महापालिका,स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे. त्यात मुंबई महापालिकेसह इतर काही महत्त्वाच्या महापालिकेवर विशेष लक्ष भाजप, शिंदे यांची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचा असणार आहे. त्यात आता राज-उद्धव हे ठाकरे बंधू एकत्र आले आणि जर काही महापालिकांमध्ये विजयाची वाट जर खडतर होत असली तर त्यासाठी महायुती म्हणून निवडणूक लढवण्याचा विचार कळत महायुतीच्या नेत्यांनी प्लॅन बी तयार केला असल्याची माहिती आहे. त्यामुळे कुठल्याही प्रकारची रिस्क न घेता नो रिस्क धोरण ठाकरे बंधूंच्या संभाव्य युती संदर्भात अवलंबणार असल्याचे कळते.

५ जुलैच्या विजय मेळाव्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे पुन्हा एकदा उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त एकत्र पाहायला मिळाले. त्यामुळे बंधुप्रेम हे ऑन स्क्रीन दिसत असताना भविष्यात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना जर ही एकत्र आले तर तयारी महायुतीला करावी लागणार आहे. विशेष करून मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे विशेष लक्ष असेल.

ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांची मुख्यत्वे करून एकत्रित ताकद ही मुंबई महापालिका, ठाणे महापालिका, कल्याण डोंबिवली महापालिका, नाशिक महापालिका, पुणे महापालिका याठिकाणी आहे. त्यामुळे या महापालिका निवडणुका लढायच्या असतील तर मतांचे विभाजन होऊन ठाकरेंना त्याचा फायदा होऊ नये यासाठी महायुती म्हणून एकत्रित येऊन ठाकरे बंधूंना आव्हान देण्याचा विचार महायुतीतील नेते करत असल्याची माहिती आहे.



याशिवाय, मुंबईची माहिती असलेल्या महायुतीच्या नेत्यांकडे निवडणुकीची जबाबदारी दिली जाईल. ज्याठिकाणी वाद असतील ते वाद येत्या महिन्याभरात मिटवून महायुतीकडून निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली जाईल. मुंबई पालिकेवर गेली अनेक वर्ष सत्तेत असलेल्या ठाकरेंच्या कारभाराची महायुती पोलखोल करण्यासोबतच मुंबईतल्या प्रत्येक वॉर्डची जबाबदारी महायुतीमधील वेगवेगळ्या आमदारांकडे दिली जाईल, असे समजते.

सणासुदीच्या काळात सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी महायुती गोविंदा पथक, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा वापर करणार आहे. ठाकरे बंधूंची जर आगामी महापालिका निवडणुकांसाठी युती झाली तर मराठी मत एकवटण्यात किंवा मग आपल्या पारड्यात पाडण्याचा पुरेपूर प्रयत्न मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडून केला जाईल. त्यामुळे याचा फटका महायुतीला बसू नये यासाठीची रणनीती महायुतीने आखल्याचे दिसत आहे. त्यामुळे या सगळ्याचा विचार करत दोन ठाकरे बंधूंची ताकद जिथे आहे तिथे त्यांना आव्हान देण्यासाठी एकत्रित येऊन लढण्याचा मार्ग महायुतीने अवलंबण्याचा विचार केला आहे. त्यामुळे जर हे झालं तर ठाकरे बंधू विरुद्ध महायुती अशी थेट लढत मुंबईसह इतर काही महापालिकांमध्ये पाहायला मिळू शकते.

## ‘ऑपरेशन सिंदूर’वरील चर्चा अन् काँग्रेस

पहलगाममध्ये दहशतवादी शिरलेच कसे, पुलवामामध्ये स्फोटके आलीच कशी, यांसारखे प्रश्न काँग्रेस नेत्यांकडून अशा प्रकारे विचारले जातात, जणू काँग्रेसच्या राजवटीत देशात कधी दहशतवादी घुसलेच नव्हते किंवा पाकिस्तानातून स्फोटके आलीच नव्हती. मुंबईवरील २६/११ हल्ला, मुंबईतील साखळी बॉम्बस्फोट, चीन व पाकिस्तानने बळकाविलेली भारताची भूमी यांसारखी असंख्य उदाहरणे काँग्रेसच्या नाकर्त्या राजवटीचे पुरावे आहेत. पण, काँग्रेसला दोष देण्यात अर्थ नाही; कारण हा आता पाकिस्तानवादी पक्ष बनला आहे. संसदेत ‘ऑपरेशन सिंदूर’वरील चर्चेला कालपासून प्रारंभ झाला असून त्यात काँग्रेसच्या नेत्यांनी केलेली भाषणे पाहिल्यास हा पक्ष आता पूर्णपणे पाकिस्तानवादी झाल्याचे स्पष्ट होते. या पक्षाचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी तर पहलगाममधील दहशतवादी हे पाकिस्तानी होते, असे सरकार कसे म्हणू शकते, असा युक्तिवाद करून आपल्या देशद्रोहीपणाचे प्रमाणच दिले. पण, आता एकंदरीतच भारतविरोध हे संपूर्ण काँग्रेस पक्षाचेच व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. या पक्षाच्या नेत्यांनी केलेली भाषणे आणि उपस्थित केलेले प्रश्न हे सरकारवरच अप्रत्यक्ष दोषारोप करणारे असून त्यामागील त्यांचा हेतू शुद्ध नाही, हे स्पष्ट होते. या भाषणांमुळे भारत कधीच शक्तिशाली होऊ नये, अशी या पक्षाची इच्छा आहे काय, अशी शंका येते. मतांच्या लाचारीसाठी झालेली काँग्रेसची ही अवनती त्या पक्षाला नामशेष करील, यात शंका नाही. चिदंबरम यांनी आपल्या भाषणात जे प्रश्न उपस्थित केले, ते पाहता त्यांना या हल्ल्यास केंद्र सरकारच जबाबदार आहे, असे म्हणायचे आहे, असे दिसते. पहलगाममध्ये हे दहशतवादी कोठून आले, त्यांची ओळख सुरक्षा यंत्रणांनी पटविली आहे का, ते पाकिस्तानातूनच आले आहेत, याचा काय पुरावा, या संघर्षात भारताचे किती लष्करी नुकसान झाले, यासारखे त्यांचे प्रश्न पाहता ते भारताच्या बाजूने आहेत की पाकिस्तानच्या, असा प्रश्न पडतो. हे दहशतवादी पहलगाममध्ये कसे आले हा प्रश्न विचारायचा असेल, तर अजमल कसाब आणि त्याचे नऊ साथीदार भारतात कसे आले, याचे उत्तरही चिदंबरम यांनी द्यावे. जणू काँग्रेसच्या राजवटीत भारतात कधी पाकिस्तानी दहशतवादी घुसलेच नव्हते. पुलवामा येथे लष्करी ताफ्यावर हल्ला झाला, तेव्हाही काँग्रेसचा सवाल होता की, तेथे ‘आरडीएस’ आलेच कसे? मुंबईत १९९३ साली साखळी बॉम्बस्फोट झाले होते, तेव्हा देशात ही स्फोटके कशी आली, याचे उत्तर काँग्रेसने दिले आहे का? प. बंगालमध्ये पुरुलिया येथे टनावारी शस्त्रास्त्रांचा साठा विमानातून टाकण्यात आला, तेव्हा केंद्रात काँग्रेसचेच सरकार होते. काँग्रेसच्याच राजवटीत भारताची हजारो किमी भूमी पाकिस्तान आणि चीनने घशात घातली आहे. तेव्हा चिदंबरम असोत की काँग्रेस, यांनी भलतेच प्रश्न विचारू नयेत. अन्यथा त्यांच्या पक्षाच्या आणि नेत्यांच्या अब्रूची लक्तरे फडकत राहतील. चिदंबरम हे केवळ गृहमंत्री म्हणून अपयशी ठरले असे नव्हे, तर देशाचे अर्थमंत्री म्हणूनही ते विलक्षण अपयशी ठरले आहेत. याच चिदंबरम यांच्या काळात देशाची अर्थव्यवस्था जगातील पाच सर्वांत नाजूक अर्थव्यवस्थांमध्ये (फ्रजाईल फाईव्ह) गणली गेली आणि भारतीय चलनी नोटा छापणारे यंत्र पाकिस्तानला विकण्यात आले. त्यामुळे पाकिस्तानला अब्जावधी रुपयांच्या नकली चलनी नोटा भारतात वितरीत करता आल्या. नोटबंदीचे हेही प्रमुख कारण होते. २०१४ साली लोकसभा निवडणुकींचे निकाल लागण्याच्या दोन दिवस आधी चिदंबरम यांनी सोने आयात करण्यात सवलत देणारी योजना सुरू केली आणि दोनच दिवसांत ती बंदही केली. या मर्यादित काळात काळ्या पैशांनी विकत घेतलेले कोट्यवधी रुपयांचे सोने भारतात कायदेशीररित्या आयात झाले. या निर्णयात चिदंबरम यांचे हितसंबंध गुंतले नसतील, असे म्हणणे हे सुज्ञ भारतीयांच्या बुद्धिमत्तेचा अपमान करणारे आहे. स्वत: चिदंबरम यांच्यावर कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे अनेक आरोप असून त्यासंदर्भात न्यायालयात खटलेही सुरू आहेत. तेसुद्धा जामिनावरच बाहेर आहेत. त्यावरून या चिदंबरम यांचे चरित्र काय लायकीचे आहे, ते दिसून येते. मुंबईवर दि. २६ नोव्हेंबर २००८ रोजी अजमल कसाब आणि त्याच्या साथीदारांनी जो हल्ला केला, ते छोटेखानी युद्धच होते आणि त्यात सुमारे १८० निरपराध नागरिकांचा बळी गेला होता. या हल्ल्याला तोडीस तोड प्रत्युत्तर देण्याइतकी हिंमत तत्कालीन काँग्रेस सरकारच्या मनात नव्हती. तेव्हा देशाचे गृहमंत्री शिवराज चाकूरकर–पाटील यांना दिवसाच्या विविध वेळेत आपल्या अंगावर वेगवेगळे पोषाख कसे दिसतील, याची फिकिर अधिक होती. तेव्हा त्यांच्या जागी या चिदंबरम महाशयांना गृहमंत्री करण्यात आले होते. पण, चिदंबरम यांनी पाकिस्तानवर लष्करी कारवाई करण्याऐवजी त्या देशापुढे पुराव्यांचे कागदी घोडे नाचविले. या सर्व पुराव्यांना पाकिस्तानने थेट कचराकुंडीत फेकून दिले. पण, तेव्हाही त्यांची आणि काँग्रेस सरकारची पाकिस्तानवर हल्ला करण्याची हिंमत झाली नाही. कदाचित तसे करण्याची तत्कालीन काँग्रेस सरकारची इच्छाही नसावी. आज जेव्हा चिदंबरम आणि काँग्रेसचे अन्य गणंग पहलगाम हल्ल्यावर पाकिस्तानचीच भाषा बोलतात, तेव्हा त्यावेळी काँग्रेसकडून पाकिस्तानवर ठोस कारवाई का झाली नाही, त्याचे रहस्य उघड होते. कारण, काँग्रेस हा पाकिस्तानधार्जिणा पक्ष बनला होता. ही गोष्ट आज उघड होत आहे.

# समाजाला कीड लावण्याचे काम राजकीय घरातून

## राज्य महिला आयोगा अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची प्रतिक्रिया

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** रेव्ह पार्टीची पुणे गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहे.ज्या पद्धतीची ही पार्टी होती. तरुणाईला नशेकडे घेऊन जाणाऱ्या या पार्टी आहेत. समाजाला कीड लावण्याचे काम या माध्यमातून होत असते.केंद्र सरकार आणि राज्य सरकारने ड्रग्सच्या विरोधातील मोहीम प्रखर केली आहे. याबाबत पोलीस कठोर कारवाई करतील. असा मला विश्वास आहे. पण अशा पद्धतीच्या चुकीच्या घटना घडताना त्या राजकीय घरातून घडत आहे. त्यामुळे ज्या पक्षाचे यामध्ये लोक आहेत, त्यांच्यावरही लगाम बसला पाहिजे. असे मत राज्य महिला आयोग, अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी त्या पुढे म्हणाले की, समाजामध्ये आपण प्रतिनिधित्व करत असताना आपले वर्तन अनुकरण करावे, राज्य महिला आयोगाची अध्यक्ष म्हणून माझा संविधान, घटनेवर आणि कायद्यावर विश्वास आहे.पोलिसांनी प्रेस घेऊन सर्व घटनाक्रम मांडला आहे. त्यांना तपासासाठी काही अवधी देणे गरजेचे आहे. दूध का दूध पाणी का पाणी कायद्याच्या चौकटीतून होईल, आपण वाट पाहू.सर्वाधिक भेटी आढावा बैठकीच्या निमित्ताने मी कोल्हापूरला दिलेल्या आहेत. राज्य महिला आयोगाकडे अनेक तक्रारी येतात, त्याचा पाठपुरावा करुन संबंधित विभागाला आम्ही त्या तक्रारी पाठवत असतो. बऱ्याच वेळा या गोष्टींसाठी आम्ही पोलिस अधीक्षक किंवा इतर अधिकाऱ्यांशी चर्चा करत असतो. त्यामुळेच आज पोलिस अधीक्षकांची भेट घेण्यासाठी आले आहे. आयसी कमिटीच्या संदर्भात कोल्हापूरच्या पोलिस, कामगार आणि जिल्हाधिकारी विभागाने अतिशय चांगल्या पद्धतीची यंत्रणा चालू ठेवली आहे.१०० टक्के बदल लगेच कुठलाही होणार नाही, पण आपण निश्चित प्रगती केली आहे. अल्पवयीन गुन्हे आणि निर्भया पथक संपूर्ण महाराष्ट्रात मी स्वतः बीट मार्शल आणि दामिनी पथकासोबत विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधण्यासाठी जाते. जिथे मला शक्य नाही तिथे प्रतिनिधी जाऊन संवाद साधतात. संपूर्ण महाराष्ट्रातून ही यंत्रणा फार ऍक्टिव्हली काम करत आहे.महाराष्ट्र पाहतो आहे, कुठल्या गोष्टीची पाठराखण त्या करत आहेत. स्वतः वर वेळ आल्यावर समजतं या गोष्टी काय असतात. कुटे प्रकरणावेळी मी स्वतः पोलिस आयुक्तांच्या संपर्कात होते. आम्ही घटनेचा अहवाल मागवून घेतला होता. कोणतीही घटनेची तक्रार दाखल झाल्यानंतर असणारी साधी प्रक्रिया सर्वसामान्य माणसाला माहित असते. न्यायालयीन प्रक्रियेत असणाऱ्या सर्व गोष्टीला न्यायप्रविष्ठ म्हणतात. पण न्यायप्रविष्ठ ही शब्द रचनाही या महिलांना समजते की नाही, मला माहित नाही. मला तर शंकाच



वाटते एकूण सगळ्या त्यांच्या ज्ञानावर
* न्यायप्रविष्ठ असताना अनेकवेळा यांनी अशा अनेक पीडित महिलांचे भांडवल स्वतःच्या राजकारणासाठी केलेलं आहे. हे दुर्दैव आहे की, न्यायप्रविष्ठ हा शब्दही त्यांच्या लक्षात येत नाही. न्यायप्रविष्ठ शब्दाचा अर्थही समजलेल्या या लोकांनी त्यावरून राजकारणाची पोळी भाजून घेतलेली आहे. आमचा कायद्यावर विश्वास आहेच, तो त्यांनी देखील ठेवला असता, तर अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले नसते. हनी ट्रॅप या संदर्भात कोणत्याही तक्रारी आलेल्या नाहीत. राज्याचे मुख्यमंत्री गृहमंत्री म्हणून या सगळ्या गोष्टींकडे लक्ष देऊन आहेत. त्यांनी वेळोवेळी या संदर्भात सविस्तर माहिती वेळोवेळी सगळ्यांना दिलेली आहे.असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## मेहकर येथे २९ जुलैला विशेष मासिक शिबीर

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मोटार वाहन चालक व मालक यांच्या सोयीसाठी तसेच स्थानिक मोटार ड्रायव्हिंग स्कूलच्या मागणीनुसार परिवहन विभागामार्फत मंगळवार दि. २९ जुलै रोजी मेहकर तालुक्यात विशेष अतिरिक्त मासिक शिबीर दौरा आयोजित करण्यात आला आहे. या शिबिराचा वाहन चालक व मालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

अतिरिक्त शिबिरांमध्ये वाहन कर वसुली, मोटार वाहन नोंदणी, वाहन तपासणी, तसेच वाहन चालक अनुज्ञप्ती संबंधित सर्व कामकाज करण्यात येणार आहे. या शिबिरात मोटार वाहन निरीक्षक उपस्थित राहून संबंधित कामकाजाचे निराकरण करतील, त्यामुळे वाहनधारक, चालक व ड्रायव्हिंग स्कूल संचालकांनी याचा लाभ घ्यावा. सर्व संबंधितांनी या शिबिराची नोंद घेऊन आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे.

## सनी देओलनं घेतली लडाखमध्ये दलाई लामा यांची भेट, चाहत्यांनी केलं कौतुक...

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता सनी देओल सध्या त्याच्या आगामी बॉर्डर २ चित्रपटामुळं चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी सनीनं त्याच्या लडाखमधील एक व्हिडिओ शेअर केला होता. त्याचा हा व्हिडिओ चाहत्यांना खूप पसंत पडला होता. आता बॉर्डर २ अभिनेत्यानं एक फोटो त्याच्या इंस्टाग्रामवरवर शेअर केला आहे. त्याचा हा फोटो दलाई लामा यांच्याबरोबरचा आहे. लडाखच्या प्रवासादरम्यान सनी हा दलाई लामा यांना भेटाला. फोटोमध्ये तिबेटी आध्यात्मिक गुरू दलाई लामा हे सनीचा हात आपल्या कपाळाला लावून प्रेमाचा वर्षाव करत आहे. आता सनीच्या या पोस्टवर अनेकजण कमेंट्स करत आहेत. सनीचा हा फोटो अनेकांना आवडला आहे.

सनी देओलनं घेतली दलाई लामांची भेट : सनीनं आपल्या इंस्टाग्राम पोस्टवर लिहिलं, आदर आणि कृतज्ञतेचा एक क्षण,लडाखच्या शांत निसर्गातून प्रवास करताना परमपूज्य दलाई लामांना भेटलो. त्यांच्या उपस्थितीनं, ज्ञानानं आणि आशीर्वादानं माझे हृदय शांतीने भरले. खरोखरच अविस्मरणीय. दरम्यान एका यूजरनं या पोस्टवर लिहिलं, गुरुपेक्षा कोणीही मोठे नाही. दुसऱ्या एकानं लिहिलं, २१ व्या शतकातील दलाई लामा हे देव आहेत. आणखी एकानं लिहिलं, तुम्ही माझे आवडते हिरो आहात. ॲक्शनसाठी नेहमीच चर्चेत असलेल्या सनी देओलनं असेही उघड केलं होतं की, तो पर्वतांमध्ये आध्यात्मिक शांतीच्या शोधात गेला होता. अभिनेत्यानं अलीकडेच बॉर्डर २ या चित्रपटाची शूटिंग पूर्ण केली. त्याचा हा चित्रपट १९९७च्या सुपरहिट चित्रपट बॉर्डरचा सीक्वेल आहे. जेपी दत्ता दिग्दर्शित चित्रपटाचा पहिला भाग हा सुपरहिट ठरला होता.

## डाक सेवांमध्ये डिजिटल क्रांती; आय. टी. २.० अप्लिकेशनचे कार्यान्वयन शनिवारी जिल्ह्यातील डाक सेवा बंद

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय डाक विभाग आपल्या सेवा प्रणालीत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी ‘आय.टी. २.०’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत एपीटी () अप्लिकेशन ही नवीन डिजिटल प्रणाली कार्यान्वित करत आहे. या नव्या प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे डाक व्यवहार अधिक जलद, अचूक आणि ग्राहकाभिमुख होणार असून, यामुळे पोस्ट ऑफिसमधील सेवा आणखी सक्षम होणार आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शाखा टपाल कार्यालये व उपडाकघरांमध्ये ही प्रणाली मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५ पासून होणार होती. परंतु रक्षाबंधन सणामुळे नव्या प्रणालीची अंमलबजावणी आता सोमवार दि. ४ ऑगस्टपासून होणार आहे. या संक्रमणासाठी आवश्यक असलेल्या डेटाच्या स्थलांतराची प्रक्रिया सोमवार दि. ४ ऑगस्ट रोजी होणारी ती आता शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार आहे. नागरिकानी यांची नोंद घ्यावी. तसेच शनिवार दि. २ ऑगस्ट रोजी बुलढाणा जिल्ह्यातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये व्यवहार करता येणार नसल्याने नागरिकांनी महत्त्वाची कामे २ ऑगस्टपूर्वीच पूर्ण करावीत, जेणेकरून व्यवहारात अडथळा येणार नाही, अशी माहिती अधिक्षक डाकघर, बुलढाणा यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे.

## गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती मंडळाचे वासा पूजन







**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** गणेश उत्सव अवघ्या काही दिवसांवर आला आहे. राज्यात आता उत्सव पूर्व तयारी सुरु झाली आहे. अनेक ठिकाणी गणेश मंडळाचे मंडप उभारण्यात येत आहेत. आज देखील पुण्यात हिंदुस्थानाचा पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टयांच्या मंडप उभारणीचे काम सुरू झाले. यावेळी वासा पूजन पुणे अप्पर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, उत्सव प्रमुख पुनित बालन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमावेळीमंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्तेउपस्थित होते.

यंदा मंडळाकडून रत्न महाल हा उभारण्यात येणार आहे. वासा पूजन आधी शिवमुद्रा ढोल ताशा पथकाकडून वादन करण्यात आले. यावेळी डीजे मुक्त मिरवणुकीसाठी पुढाकार घेतलेले हिंदुस्थानातील पहिल्या गणपतीचे विश्वस्त पुनीत बालन म्हणाले की यंदाच्या गणेशोत्सव हा डीजे मुक्त मिरवणुकीसाठी करण्याचा संकल्प केला आहे. गेल्या वर्षी डीजे लावलेल्या २५ मंडळांनी यावर्षी डीजे न लावण्याचा निर्णय घेतला आहे या मंडळामध्ये च्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. डीजे मुळे मानवी जीवनावरती अनेक परिणाम होत आहेत डीजेच्या लेझर मुळे अनेकांना अंधत्व येत आहे या गोष्टीचा विचार करून मंडळांनी डीजे लावणे बंद करावं असा आव्हान पुनीत बालन यांनी केला आहे. यावेळी पुणे शहर अप्पर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांनी आपली भावना व्यक्त करताना पोलीस वाल्यांनी घेतलेला निर्णय अत्यंत समाज हिताचा आहे या ला सर्वांनी पाठिंबा देऊन ही एक चळवळ उभी करावी असा आव्हान केलं.

# पर्यटनविषयक कार्यक्रमांसाठी प्रायोजकत्वाचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणे बंधनकारक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील पर्यटनविषयक विविध महोत्सव, कार्यक्रम आणि उपक्रमांना प्रायोजकत्व मिळवण्यासाठी महत्त्वाचा बदल जाहीर करण्यात आला आहे. यापुढे प्रायोजकत्वासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे सर्व प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या maharashtratourism.gov.in या अधिकृत संकेतस्थळाद्वारे ऑनलाईन पद्धतीने सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे, पर्यटन विभागाने प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

या संदर्भात, ३० एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयानुसार हा बदल करण्यात आला आहे. आतापर्यंत विविध शासकीय संस्था, सेवाभावी संस्था आणि खासगी संस्थांद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या पर्यटनविषयक कार्यक्रमांचे प्रायोजकत्वाचे प्रस्ताव थेट कार्यालयात सादर केले जात होते. नवीन कार्य पद्धतीनुसार, कोणताही कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी ३० दिवस अगोदर पर्यटनविषयक प्रायोजकत्वाचे प्रस्ताव ऑनलाइन सादर करणे आवश्यक आहे.

यासाठी संदर्भाकरिता https://sponsorship.maharashtratourism.gov.in ही थेट लिंक देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व संबंधित शासकीय



संस्था, सेवाभावी संस्था आणि खासगी संस्थांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी या बदलाची नोंद घ्यावी आणि यापुढे प्रायोजकत्व निधी मागणीचे प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीनेच सादर करावेत. स्थानिक पातळीवरील संबंधितांनाही याबाबत माहिती देण्याची सूचना देण्यात आली आहे.

हा निर्णय पर्यटन विभागाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे. यामुळे प्रायोजकत्व प्रक्रिया अधिक वेगवान आणि कार्यक्षम होणार आहे. ऑनलाईन प्रक्रियेमुळे निधी वितरणात एकसमानता आणि गतिमानता येईल, तसेच प्रशासकीय कामकाजात सुलभता येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...


### केमिकलने भरलेला आयशर टेम्पो केमिकलने भरलेले बॅरल जंगलात



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** गोव्याहून मुंबईच्या दिशेने जाताना गुगल मॅप द्वारे शॉर्टकट शोधून फुणगुस मार्गे जाताना केमिकलने भरलेला आयशर टेम्पो पलटी होऊन अपघात झाला. या अपघातात आयशरमधील केमिकलने भरलेले बॅरल जंगलात वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने आयशर चालकाने गाडीतून उडी मारल्यामुळे जीवितहानी टळली. कलर साठी लागणारे ४७ बॅरल घेऊन आयशर टेम्पो चालक गोवा महामार्गावरून मुंबईकडे जात होता. निवळी येथे आल्यानंतर त्याने गुगल मॅपचा आधार घेतला. गुगल मॅपने फुणगुस आणि ऊक्षी मार्ग दाखवला. मात्र, ऊक्षी मार्गावरील अवघड वळणामुळे त्याने जाकादेवी फ ुणगुस मार्गे संगमेश्वरला जाण्याचा निर्णय घेतला. एका अवघड वळणावर गाडीवरील ताबा सुटल्याने आयशर उजव्या बाजूला कलंडला. यामध्ये असलेले ४७ बॅरल पैकी ३० बॅरल शिल्लक राहिले आहेत. बाकीचे बॅरल उतारावरील जंगलात वाहून गेले आहेत. आयशरचे यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### धनंजय मुंडे यांच्या वक्तव्याला आमदार प्रकाश सोळुंके यांचे उत्तर




दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळात वर्णी लागणार असल्याची चर्चा सुरू असताना, राष्ट्रवादी अजित पवार गटांमध्येच मंत्रिपदावरून संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. माजलगाव मतदार संघाचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी या संदर्भात उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. जर पक्षाला त्यांना मंत्री करायचे असेल, तर माझ्या शुभेच्छा आहेत. मात्र ज्येष्ठांना देखील न्याय मिळाला पाहिजे. मात्र असं होताना दिसत नाही. गेल्या ४५ वर्षात या बीड जिल्ह्यामध्ये कॅबिनेट मंत्री असेल, किंवा पालकमंत्री असेल हे ओबीसी आणि मागासवर्गीय समाजाला मिळाले आहे. मात्र वारंवार मराठा समाजाला यापासून डावले जात आहे. - बीड जिल्ह्याची बदनामी कोणी केली हे सर्वांना माहीत आहे. बीड जिल्ह्याची बदनामी तर यांनीच केली आहे. स्वर्गीय संतोष देशमुख यांची निर्घृन पणे हत्या केली गेली. कोणी जर म्हणत असेल तर जिल्ह्याची बदनामी केली तर ते चुकीचा आहे.. असं म्हणत आमदार प्रकाश सोळुंके यांनी प्रतिक्रिया दिली.

### अमली पदार्थ विक्री करणाऱ्या चार आरोपींना साकीनाका पोलिसांनी केली अटक



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई येथील अमली पदार्थ विरोधी पथकाने मागच्या महिन्यात ड्रग्ज कारवाई केली होती. या प्रकरणात तीन आरोपींना अटक करण्यात आली होती आणि त्यांच्याकडून मॅफेड्रोन जप्त करण्यात आले होते. याचं कारवाईत दोन दिवसांपूर्वी चौथ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणामध्ये कर्नाटक मधील म्हैसूर शहराच्या जवळपास हा धंदा चालतो अशी माहिती पोलिसांना मिळाली. या ठिकाणी साकीनाका पोलिसांची टीम पाठवण्यात आली आणि पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत १८७.९७ किलो मॅफेड्रोन जप्त करण्यात टीमला यश आले आहे. या प्रकरणात एकूण आठ आरोपी आरोपींना अटक करण्यात आली असून, या आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे का? याचा शोध पोलीस घेत आहेत.

# दिल्लीमध्ये महाराष्ट्र शासनामार्फत उभारण्यात येणाऱ्या सांस्कृतिक भवनाचा आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर



**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था :** दिल्लीतील ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात महाराष्ट्र शासनामार्फत दिल्लीमध्ये बहुउद्देशीय सांस्कृतिक भवन उभारण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. महाराष्ट्र सदन परिसरात त्यासाठी जागा निश्चित करण्यात आली असून त्याचा प्रस्तावित आराखडा निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नुकताच सादर केला.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या दिल्ली दौऱ्यावेळी महाराष्ट्र सदनाच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत श्रीमती आर विमला यांनी विविध प्रस्ताव सादर केले. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक भवनाबाबत सविस्तर चर्चा झाली. या सांस्कृतिक भवनामध्ये बहूउद्देशीय सभागृह, महाराष्ट्रातील भारतीय प्रशासकीय सेवेतील विविध पदांसाठी मुलाखत पात्र उमेदवारांसाठी निवास व्यवस्था, प्रशस्त ग्रंथालय व अभ्यासिका व अनुषंगिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली.

तसेच महाराष्ट्र सदन परिसरातील अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने आणि अन्य प्रशासकीय बाबींसंदर्भात सविस्तर सादरीकरण निवासी आयुक्त श्रीमती विमला यांनी केले. यासह महाराष्ट्रातील ऋतूनिहाय फळांचे प्रदर्शन व विक्री दालन आणि बचत गटांच्यामार्फत उत्पादित वस्तूचे प्रदर्शन दालन वर्षभरासाठी य ठिकाणी असावे या संदर्भात सुरु असलेल्या नियोजनची माहिती यावेळी देण्यात आली. महाराष्ट्र महोत्सव दिल्लीत आयोजित करण्यात यावा यामध्ये महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे दर्शन घडाविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचे प्रस्तावित आहेत. यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील मागणीही करण्यात आली. मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी या सर्व प्रकल्पाबाबत सकारात्मकता दर्शविली असून पुढील कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना दिल्या.

## विद्युत प्रवाह असलेला तार बैलाच्या अंगावर पडल्याने बैल जागीच ठार

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी

**यवतमाळ** : रविवार सकाळी ११ वाजताच्या दरम्यान कलगाव येथील शेतकरी ओमप्रकाश अट्टल यांच्या शेतात चरत असलेले बैलांच्या अंगावर अचानक विद्युत प्रवाह असलेला तुटून बैलाच्या अंगावर पडल्याने बैल जागेवरच मरण पावला शेतात असलेल्या गड्याने ओम प्रकाश अटल यांना फोन लावून बैल मरण पावल्याची माहिती दिली. ओमप्रकाश अट्टल यांच्या शेतात चरत असताना बैलाच्या अंगावर विद्युत प्रवाह असलेला तार तुटून पडल्याने बैल जागेवर ठार झाला शेतीच्या कामाच्या दिवसातच काळाने घाला घातल्याने शेतकऱ्यावर आर्थिक संकट कोसळले शेतकरी ओम प्रकाश यांनी दिग्रस पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्यानंतर बीड जमादार कैलास देवकर व पटवारी अशोक साबळे यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला पशुवैद्यकीय विकास अधिकारी अरुण जाधव सहाय्यक जुनेद व सलीम शेख व सहदेव यांनी पोस्ट पोस्टमार्टम केले. विद्युत महामंडळाचे कलगाव येथील विद्युत अभियंता अंकित पाटील सहाय्यकअकिब दुंगे, सुनकेवार यांनी पंचनामा केला शॉर्टसर्किट झाल्यामुळे तार तुटून पडले आहे पडले असेल असे विद्युत अभियंता अंकित पाटील यांनी सांगितले.बैलाची अंदाजे किंमत ८० हजार रुपये इतकी असल्याने शेती हंगामाच्या दिवसात एक बैल मरण पावल्याने शेतकरी संकटात सापडले आहे. अनेक समस्यांना समोर जाऊन शेतकरी आपली शेती कशी बशी करत आहे.त्यात नवीन संकट आल्याने लवकरात लवकर योग्य ते मदत अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

### गणेशोत्सव मंडळांना बीएमसीचा दणका! खड्डा खोदला तर थेट १५ हजारांचा दंड; मुंबईत मंडळांची चिंता वाढली

**मुंबई/प्रतिनिधी :** गणपती बाप्पाच्या आगमनासाठी अवघे काही आठवडे बाकी असताना, मुंबई महापालिकेने गणेशोत्सव मंडळांवर नवा बडगा उगारला आहे. गणेश मंडळांनी जर सार्वजनिक रस्त्यावर खड्डा खोदला, तिथे मंडपाचे काम केलं, तर त्यांना थेट १५,००० रुपयांचा दंड ठोठावला जाणार आहे. मागील वर्षी हा दंड केवळ २ हजार रुपये होता. त्यामुळे यंदा तो साडेसात पटीनं वाढवण्यात आलाय.

महापालिकेच्या या निर्णयामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक मंडळांनी या दंडाच्या निर्णयाचा जोरदार विरोध केला असून, तात्काळ हा आदेश मागे घेण्याची मागणीसुद्धा केली आहे. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सव मंडळांना परवानग्या, अटी आणि आर्थिक बोजामुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यात आता वाढीव दंडामुळे मंडळांच्या नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## कोकण किनारपट्टीला ३.८ ते ४.३ मीटर उंच लाटांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्रामार्फत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना २८ जुलै २०२५ सायंकाळी ५.३० ते ३० जुलै २०२५ रोजीचे रात्रौ ८.३० पर्यंत ३.८ ते ४.३ मीटर उंच लाटांचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत लहान होड्यांना समुद्रास न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या असून समुद्राची धूप आणि उंच लाटांचे तडाखे समुद्र किनारी येण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

राज्यात पुढील २४ तासांसाठी पुणे घाट या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. गोसीखुर्द प्रकल्प (वैनगंगा नदी) येथून २ लाख ४७ हजार ३ क्यूसेक्स, उजनी धरणातून ४१ हजार ६०० क्यूसेक्स, भिमा नदी दौंड पूल येथून ३२ हजार ६४० क्युसेक विसर्ग करण्यात आला असून नागरिकांना जिल्हा प्रशासनामार्फत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीला पूर आल्याने सरपखेड धोडप बुद्रुक मार्ग काही वेळासाठी बंद करण्यात आला होता. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यात आपत्तीच्या अनुषंगाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरणात ९१ हजार ५४८ क्युसेक इतकी आवक होत असून धरणातून १ लाख २० हजार क्युसेक पाण्याची जावक असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

## काँग्रेस म्हणजे गांधी आणि गांधी म्हणजे काँग्रेस : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भाजपवर टीका

दैनिक आपला विदर्भ


**बुलढाणा/प्रतिनिधी :** भाजपा आमदार सुमित वानखेडे यांनी गांधींची लेगसी चालवणारा काँग्रेस मध्ये कुणी राहिला नाही. यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आमदार सुमित वानखडे यांचे विधाने अत्यंत हास्यास्पद आणि बुद्धिभेद निर्माण करणारे वक्तव्य आहे. मुंह में राम बगल में छुरी, अशी भाजपाची प्रवृत्ती आहे. अशी टीका सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना भाजपवर केली


एवढी ते म्हणाले की, गांधींच्या विचारातून काँग्रेस तयार झालेली आहे. काँग्रेस मध्ये गांधी आणि गांधी म्हणजे काँग्रेस आहे. मोदींच्या नावावर त्यांनी महामानव आणि नॉन नोलेजेबल माणूस म्हणून देण्याचा प्रयत्न केला. त्यांना गांधीचा आश्रय घ्यावा लागला हा केविलवाणा प्रयत्न आहे. त्यांनी रेशीम बागला हे चिंतन शिबिर घ्यायला पाहिजे




होते किंवा सावरकरांच्या जन्मभूमी शिबिर घ्यायला पाहिजे. त्यांच्याजवळ कोणतेही महामानव नसल्याने, कोणताही वारसा नसल्याने त्यांचा देशाचा काँग्रेसचा वारसा चोरण्याचा प्रयत्न आहे. मात्र, ही सर्व मंडळी नथुराम गोडसे यांची औलाद आहे. असे वक्तव्य म्हणजे गांधींवर हल्ला करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. हो, मी अर्बन गांधीयन आहे. अर्बन नक्षलाईट असे म्हणून जो अपप्रचार करतात, त्याला हे माझे उत्तर आहे. तुमच्यात हिंमत असेल तर मला अटक करा, असे आव्हान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना दिले.

## अमृता फडणवीसांनी केली चंद्रपुरात शिवलिंगाची पूजा





दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** पहिल्या श्रावण सोमवारचे औचित्य साधून आज अमृता फडणवीस यांनी चंद्रपुरातील भव्य शिवलिंगाची पूजा केली. स्थानिक आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्ताने सेवा आठवडा साजरा केला. याअंतर्गत आज भिवापूर परिसरात असलेल्या विदर्भातील सर्वात मोठ्या शिवलिंगाची पूजा आयोजित करण्यात आली. यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अर्धांगिनी अमृता फडणवीस चंद्रपुरात आल्या. त्यांनी मनोभावे शिवलिंगाची पूजा केली. शिवलिंगावर पुष्पाची उधळण केली. याप्रसंगी त्यांनी दर्शनी भागापासून शिवलिंगापर्यंत कावळही खांद्यावर नेली. भाविकांनी यावेळी एकच जल्लोष करीत हर हर महादेवाच्या घोषणा दिल्या. अमृता फडणवीस यांनी यावेळी बोलताना शिवाचे आध्यात्मिक महत्व सांगितले आणि एक मंत्रही गायले.

# लोणार बिटजमादार व पोलीस कर्मचारी यांनी वाचवले पाण्यात बुडणाऱ्या दीड वर्षीय मुलाचे प्राण !

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**लोणार** : लोणार शहराबाहेरील घरकुल परिसरात लोणार पोलीस स्टेशनचे बिट जमादार संतोष चव्हाण व पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर निकस हे पेट्रोलिंग साठी घरकुल परिसरात गेले होते त्या ठिकाणा वरून पेट्रोलिंग करून परत येत असतांना त्यांना त्या ठिकाणी एका डोहात जवळ मुलगा ओरडत उभा होता त्यांची नजर डोहा जवळ गेली तर एक चिमुकला पाण्यात बुडताना दिसून आला क्षणाचाही विलंब न करता पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर निकस यांनी पाण्यात उडी घेऊन त्या बालकाला पाण्यातून बाहेर काढले व त्यांचा कुटुंबियांच्या स्वाधीन केले त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले त्यांच्या या कामगिरी मुळे सर्वत्र पोलीस कर्मचारी यांचेवर कोतुकाचा वर्षाव होत आहे या वरून असे समजते देव तारी त्याला कोण मारी! खरच पोलीस बिट जमादार संतोष चव्हाण व अंमलदार ज्ञानेश्वर निकस हे त्या मुलाच्या साठी देवदूत ठरले हे मात्र खरे त्यांच्या या कामाची दखल नवनियुक्त पोलीस अधिकारी यांनी घेऊन त्यांचा गौरव करावा हीच उल्कानगर वासीयांची इच्छा

बॉक्स :- घरकुल परिसरातील हा पाण्याच्या डोह खूप धोकादायक आहे भविष्यात अशी घटना परत घडू नये या साठी प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी घरकुल वासी करीत आहेत

बॉक्स :- या डोहात फार मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले आहे त्या मुळे त्या परिसरातील नागरिकांनी सतर्कता ठेवावी व आपल्या चिमूकल्याकडे लक्ष ठेवावे

**- पोलीस निरीक्षक निमिष मेहत्रे**



# मोताळा नगराध्यक्ष माधुरी देशमुख यांच्यासह इतरांना अटकपूर्व जामीन मंजूर

## नगराध्यक्षांच्या जामीनासाठी ॲड शर्वरी सावजी –तुपकरांचा युक्तीवाद

दैनिक आपला विदर्भ

**मोताळा/प्रतिनिधी** : मोताळा येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी बनावट ठराव व बनावट ना हरकत प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी मोताळा नगराध्यक्ष माधुरीताई देशमुख यांच्यासह इतर चौघाविरुद्ध बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान आपल्याला अटक होऊ नये यासाठी अटकपूर्व जामीन मिळावा म्हणून माधुरी देशमुख यांनी ॲड. शर्वरी सावजी –तुपकर यांच्यामार्फत न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला होता. ॲड. शर्वरी सावजी –तुपकर यांनी याप्रकरणी न्यायालयात केलेल्या प्रभावी युक्तिवादामुळे माधुरी देशमुख यांचा अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे.

मोताळा येथे सौर प्रकल्प उभारायच्या दृष्टीने पॉवर इंडिया व्हेंचर्स प्रा. लिमिटेड या कंपनीला नगर पंचायतीचा बनावट ठराव व मुख्याधिकारी गणेश पांडे यांची बनावट सही शिक्का असलेले ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप,व यामुळे नगरपंचायतीचा दहा लाखाहून अधिक विविध स्वरूपाचा कर बुडाला. बनावट कागदपत्रे तयार करण्यासह शासनाचा महसूल बुडवून फसवणूक केल्याप्रकरणी मोताळा नगर पंचायतीच्या नगराध्यक्षा श्रीमती माधुरी पुरुषोत्तम देशमुख यांच्या सोबतच स्वीकृत नगर सेवक अमोल देशमुख, नगर पंचायतचे कर्मचारी सुनील मिरकुटे व कंपनीचे कर्मचारी महेश सहाणे , शांताराम लोखंडे यांचे विरुद्ध बोराखेडी पोलीस स्टेशन येथे भा दं वि चे कलम ४२०, ४६७, ४६८ ३४ अन्वये बोराखेडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी शेंगेपल्लू यांचे फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आलेला होता. बोराखेडी पोलिसांनी या सर्वांना अटक करण्याची तयारी चालवली होती.

परंतु नगराध्यक्षा माधुरीताई देशमुख व इतर सर्व आरोपी गुन्हा दाखल झाल्या पासून भूमिगत होते. आपल्यावर झालेली ही कारवाई राजकारणातून आणि आकसापोटी झाल्यामुळे सर्वांनी मलकापूर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात अटकपूर्व जमानत मिळणे करीता धाव घेतली होती.



दरम्यान या प्रकरणी २८ जुलै रोजी अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. बी. जाधव यांच्यासमोर सुनावणी झाली. माधुरी देशमुख यांचेसाठी ॲड शर्वरी सावजी– तुपकर यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करून बनावट ना हरकत प्रमाणपत्राशी माधुरीताई देशमुख यांचा काही संबंध नसून राजकीय वैमनस्यातून त्यांना ह्यात गोवण्यात आले आहे ह्याकडे मा. न्यायालयाचे लक्ष वेधले अनेक प्रभावी मुद्दे मांडून ताकदीने बाजू मांडली, तो युक्तीवाद ग्राह्य धरत मा. न्यायालयाने नगराध्यक्षा माधुरी देशमुख यांना सशर्त अटकपूर्व जमानत मंजुर केली आहे. तसेच या प्रकरणातील इतर आरोपी असलेले स्वीकृत नगर सेवक अमोल देशमुख, नगर पंचायत मोताळाचे कर्मचारी सुनील मिरकुटे व कंपनीचे कर्मचारी महेश सहाणे , शांताराम लोखंडे यांचेसाठी वेगवेगळ्या वकिलांनी काम पाहिले. याही आरोपिंना न्यायालयाने सशर्त अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे.

## विविध वृत्त...

### बुलढाण्यात महिलांची भव्य कावड यात्रा; आई वडिलांचा सांभाळ करण्यासाठी महादेवाला साकडं




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** श्रावण महिना म्हंटल की सगळीकडेच भक्तीने वातावरण असते. या महिन्यात महादेवाच्या देवस्थानावरून कावड यात्रा आणण्याची पुरुषांची ही परंपरा जुनीच. मात्र प्रथमच बुलढाणा शहरातील भक्ती गणेश महिला मंडळाच्या वतीने असंख्य महिलांच्या साक्षीने कावड यात्रा काढण्यात आली. काढण्यात आलेल्या कावड यात्रेत असंख्य महिलांनी पारंपारिक सहभाग नोंदवला आहे. तर त्यांनी दिला जीवनाला रूप आता तुमच काम, आई वडील सांभाळ हे सच्चे स्वरुप..आई वडील समजू नका सेवा, तीच आहे आयुष्यभराची पुण्याची मेवा.. अशा आशयाचे बॅनर महिलांनी हातात घेऊन लक्ष वेधले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालय ते भूमिअभिलेख कार्यालय रस्त्यावर मोठं मोठे खड्डे; खड्ड्यातील पाण्यात बसून प्रहारचे आक्रमक आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** स्वच्छ अमरावती सुंदर अमरावती या मनपा च्या घोषनेचे तीन तेरा वाजल्याचे दिसून येत आहे. पावसाच्या पाण्याने शहरातील रस्त्याचे पितळ उघडे पडले. अनेक परिसर मार्गावर खड्डेच खड्डे पडले मात्र मनपा प्रशासन सह सार्वजनिक बांधकाम विभाग कुंभकर्णी झोपेत असल्याचे दिसून येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय ते भूमिअभिलेख कार्यालय मार्गावर भीषण अवस्था निर्माण झाली. रस्त्यावर खोल खड्डे आणि त्यात पावसाचे पाणी साचल्याने येजा करणारे कर्मचारी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

एका दिव्यांग बांधवाची दुचाकी खड्ड्यात पडल्याने प्रहार संघटनेच्या आक्रमक होतं. थेट रस्त्यावर उतरून खड्ड्यात बेशर्म रोपटे लावून सार्वजनिक बांधकाम विभागाचा निषेध व्यक्त केला. तर काही पदाधिकारी थेट खड्ड्यातील पावसाच्या साचलेल्या पाण्यात बसून प्रशासन विरोधात घोषणा देत निषेध करण्यात आला.

### ‘‘हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र‘‘ अभियानांतर्गत महिला व बाल विकास विभागाची वृक्ष लागवड मोहीम

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ‘‘हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र‘‘ या अभियानाच्या अंतर्गत गुरुवार, २४ जुलै रोजी महिला व बाल विकास भवन, येथे वृक्ष लागवड करण्यात आली. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिघुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

या उपक्रमांतर्गत वर्ष २०२५ साठी राज्य शासनाने घेतलेल्या १० कोटी वृक्ष लागवड उद्दिष्टाचा एक भाग म्हणून एकूण २२ वृक्षांचे रोपण करण्यात आले. पर्यावरणसंवर्धन व हरित महाराष्ट्र घडवण्याच्या दृष्टीने ही कृती महत्त्वाची ठरत आहे.

कार्यक्रमास विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. यामध्ये शासकीय मुलींचे बालगृह व निरीक्षणगृह अधीक्षक सुनिल वाठोरे, परिविक्षा अधिकारी श्रीकृष्ण इंगळे व उमेश निकम, संरक्षण अधिकारी रामेश्वर वसु, दिवेश मराठे यांचा सहभाग होता.जिल्हा बाल संरक्षण कक्षातील कर्मचारी तसेच चाईल्ड हेल्पलाइन समन्वयक सोहेप शेख व कनिष्ठ काळजी वाहक अजय सोनूने यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# विविध पॅकेज टुर्सचे आयोजन: प्रवाशांनी लाभ घ्यावा

## राज्य परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाचा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बुलढाणा विभागातर्फे सर्व आगारांमधून पर्यटकांसाठी विशेष पॅकेज टुर्सचे आयोजन करण्यात आले आहे. या टुर्सचा जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विभाग नियंत्रक तसेच विभागीय वाहतूक अधिकारी यांनी केले आहे. या पॅकेज टुर्स अंतर्गत एक दिवसापासून ते तीन दिवसांपर्यंतच्या देवदर्शन आणि पर्यटनस्थळांच्या भेटीचा समावेश आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार ग्रुप बुकींगद्वारे ही सेवा राबविण्यात येणार असून, सर्व आगारांमधून नियोजित स्थळांकरिता वाहतूक सेवा उपलब्धा करून देण्यात येईल.

**एक दिवसांचे पॅकेज टुर्स :** अजिंठा लेणी–वेरुळ घृष्णेश्वर–खुलताबाद–परत, शेगाव–चिखलदरा–परत, पैठण–परत.

**दोन ते तीन दिवसचे पॅकेज टुर्स:** कपीलधार–तुळजापूर–अक्कलकोट–पंढरपूर–परत, आळंदी–देहू–भिमाशंकर–परत, शिर्डी–शनिशिंगणापूर–देवगड–परत, औंढा नागनाथ–परळी वैजनाथ–परत, नाशिक–वणी सप्तशृंगी–त्र्यंबकेश्वर–परत, मुक्ताईनगर–चांगदेव–इच्छापूर–अंमळनेर–परत. याशिवाय प्रवाशांच्या विशेष मागणीनुसार मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर व उज्जैन या प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांसाठी देखील वाहतूक सेवा पुरविण्यात येईल. या पॅकेज टुर्सची माहिती, शुल्क, प्रवासाचे वेळापत्रक, बुकिंग प्रक्रिया इत्यादी तपशीलासाठी आपल्या नजीकच्या एस. टी. आगारास भेट देऊन सविस्तर माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताहानिमित्त अमृता फडणवीस चंद्रपूर दौऱ्यावर



**चंद्रपूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने सुरू असलेल्या देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस चंद्रपूर दौऱ्यावर आल्या आहेत.

अमृता फडणवीस दुपारी चंद्रपूरमध्ये दाखल झाल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम कोतवाली वार्ड येथील ‘राजमाता निवास’ येथे आमदार किशोर जोरगेवार यांची सदिच्छा भेट घेतली. त्यानंतर आयोजित सायकल वितरण कार्यक्रमात अमृता फडणवीस यांच्या हस्ते प्रतीकात्मक स्वरूपात ५५ विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.

एकूण २०५५ विद्यार्थ्यांना या उपक्रमातून सायकली देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यानंतर अमृता फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जीवनपटावर आधारित भव्य चित्रप्रदर्शनाला भेट दिली. त्यांनी प्रदर्शनातील विविध पैलूंना गौरवले व उपस्थितांच्या प्रतिसादाचे कौतुक केले.

# विटभट्टीवर मोलमजुरी करणाऱ्याचा मुलगा झाला पोलीस

दैनिक आपला विदर्भ

■ महेबूब शेख



**उमरखेड** : ढाणकी मधील टेमेश्वर नगर( झोपरपट्टी) मध्ये रहाणारा अफरोज खा निसार खा पठाण याच्या घरची परिस्थिती हलाखीची असताना सुद्धा उराशी देश सेवा करण्याचे स्वपन्न बाळगून वीटभट्टी वर मोल मजुरी करून त्याने आपले स्वप्न पूर्ण करत यशाला गवसणी घातली आहे. त्याचा हा संघर्षमय प्रवास प्रत्येक तरुणाला प्रेरणादायी आहे. अफरोज खा निसार खा पठाण हा ढाणकी मधील झोपरपट्टी येथील रहिवाशी असून त्याच्या घरची परिस्थिती हलाखीची असून आई वडील दोघेही विटभट्टी वर मोलमजुरी करून घर गाडा चालवणारे, त्याच स्वप्न देशाची सेवा करायची . खाकी वर्दी अंगावर असावी असं स्वप्न पूर्ण करण्यासाठी अफरोज यांनी आपल्या आई वडीला सोबत विटभट्टी वर काम करून अभ्यास केला. हलाखीच्या परिस्थितीतही आपलं शिक्षण पूर्ण करून जिद्दीच्या आणि परिश्रमाच्या जोरावर तो पोलीस झाला.तो ची ट्रैनिंग पूर्ण करून आता चंदीगड येथे कर्तव्यावर रहाणार असून. तो आज आपल्या गावी ढाणकी आला असता त्याचा काका अशद खा पठाण यांनी त्याच जंगी स्वागत करून मिरवणूक काडत सत्कार स्वागत समारंभ ठेवला. या समारंभामध्ये बिटरगाव पोलीस स्टेशन ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी युवकांना संबोधित करत अफरोज चा उदहारण देत जीवनात यशस्वी होण्याचा कानमंत्र दिला. तसेच पांडुरंग शिंदे ठाणेदार, ढाणकी शहर शिवसेना अध्यक्ष संजय सल्लेवाड(शिंदे गट) व सामाजिक कार्यकर्ते यांनी अफरोज आणि त्याच्या आई वडिलांचा सत्कार केला आणि शुभेच्छा दिल्या.

# दिग्रस च्या दुहेरी खून प्रकरणातील आरोपींना जामीन मंजूर; दारव्हा सत्र न्यायालयाचे आदेश

दैनिक आपला विदर्भ



**दिग्रस/प्रतिनिधी** : दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी दिग्रस तालुक्यातील साखरी फेट्रीरी मार्गावरील वनपरिक्षेत्र येथे दुहेरी हत्याकांड घडले होते. त्याच हत्याकांडातील तिसऱ्या आरोपीस दारव्हा सत्र न्यायालयाने २३/०७/२०२५ रोजी जामीन मंजूर केला असून तिसरा आरोपी म्हणजेच धर्मराज तुकाराम बोडके. त्याची जामीनावर सुटका झाली असून घटनाक्रम पुढील प्रमाणे, दिग्रस शहरातील रेणुका देवी भवानी माता मंदिर मागील साखरी फेटरी रस्त्यावरील वनपरिक्षेत्र मध्ये आकाश बल्लाळ व वर्षागिरी यांचा सांगाडा शिल्लक असलेला प्रेत आढळून आल्याने खळबळ उडाली होती मात्र दिग्रस पोलिसांनी अवघ्या काही तासातच घटनेचा उलगडा करून एकूण पाच आरोपी जेरबंद केले होते. एप्रिल २०२५ पासून पाचही आरोपींना कारागृहात रवाना केले होते.परंतु पाच पैकी आरोपी क्रमांक तीन म्हणजेच धर्मराज बोडके यांची जामीन होऊन त्यांची कारागृहातून सुटका झाली असून दिग्रस चे सुप्रसिद्ध विधीज्ञ एडवोकेट शाहरुख शेख यांनी तुकाराम बोडके यांच्या जामिनीकरिता व आपल्या पक्षकाराला सोडवण्याकरिता आपल्या कौशल्याचा वापर करुन युक्तिवाद केला. व आरोपीस जामीन मंजूर करून दिला.यात एडवोकेट पंकज खडसे व एडवोकेट चंदन पवार यांनी सहकार्य केले.

# आत्महत्याग्रस्त थुट्टे कुटुंबीयांना शिवसेना प्रवक्ता ॲड.जयश्रीताई शेळके यांची सांत्वनपर भेट

दैनिक आपला विदर्भ



**चिखली/प्रतिनिधी** : तालुक्यातील भरोसा गावाला शेतकरी चळवळीचा एक मोठा इतिहास आहे. त्याच गावात गणेशराव थुट्टे वय ५८ वर्ष आणि रंजनाताई थुट्टे वय ५५ वर्ष या दाम्पत्याने कर्जबाजारी पणाला कंटाळून ४ दिवसांपूर्वी आत्महत्या केली. या आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची २८ जुलै रोजी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्रीताई शेळके यांनी भेट घेतली. यावेळी चिखलीचे तहसीलदार यांच्यासोबत बोलून यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली केली. झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. या दुःखात कुटुंबियांच्या सोबत असल्याची भावना व्यक्त केली.

तालुक्यातील भरोसा गावाला शेतकरी चळवळीचा मोठा इतिहास लाभलेला आहे. याच गावातील गणेशराव थुट्टे व रंजनाताई थुट्टे यांनी सततच्या नापिकीला कंटाळून या दाम्पत्यांनी आत्महत्या केली आहे. त्यांच्याकडे शेतीचा ताबा असला तरी त्यांच्या नावाने स्वतंत्र सातबारा नव्हता. अनेक वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित होता. प्रशासनाकडे सतत पाठपुरावा करून स्वतंत्र सातबारा तयार करण्याची मागणी केली होती मात्र त्याला अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवल्याने त्यांच्या समस्येत आणखीच वाढ झाली. सततची नापिकी व सदर मागणीला कडे दुर्लक्ष केल्याने निराशा आलेल्या या दांपत्याने गत चार दिवसापूर्वी आत्महत्या केली. त्यामुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. सततची नापिकी शेतीतील वाढलेला लागवडीचा खर्च व उत्पादन झाल्यानंतरही पिकांना मिळत नसलेला भाव यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक दृष्ट्या डबघाईस आला आहे. मोठ्या प्रमाणात उत्पादन काढल्यानंतर अपेक्षित उत्पादन मिळत नसल्याने दरवर्षी कर्जाचा डोंगर वाढत आहे. खते, बी, बियाणे, औषधी, लागवड खर्च प्रचंड प्रमाणात वाढला आहे. तर त्या तुलनेत शेतीमालाला भाव मिळत नसल्याने शेतकरी वर्ग आर्थिक दृष्ट्या अडचणी येत आहे. पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळत नसल्याने जीवाची होत असलेली परवड सहन न झाल्याने तालुक्यातील भरोसा गावातील गणेश थुट्टे व रंजनाताई थुट्टे या दाम्पत्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली आहे.शेतकरी दांपत्याची आत्महत्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली असून शासन प्रशासनाचा नाकर्तेपणा उघड झाला आहे. तालुक्यातील शेतकरी दांपत्याने केलेल्या आत्महत्या चे माहिती होताच उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या प्रवक्त्या अड. जयश्रीताई शेळके यांनी भरोसा गावात जाऊन आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांची भेट घेतली. त्यांच्या समस्या जाणून घेत त्यांना मदत देण्याची मागणी तहसील प्रशासननाकडे केली. यावेळी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.